# मागासलेल्या जातींसाठी नोकरीतील ठेवावयाच्या राखीव जागेचा जाहीरनामा

**करवीर सरकारचें ग्यॉझिट, २ ऑगस्ट १९०२.**

**खाजगी खाते, तारीख २८ जुलै १९०२**

**यादी.**—रा. रा. नायब खाजगी कारभारी निसबत सरकार करवीर यांजकडे.

खाजगी कारभारी निसबत सरकार करवीर यांजकडून.

सध्यां कोल्हापूर संस्थानामध्ये सर्व वर्णांच्या प्रजेस शिक्षण देण्याबद्दल व त्यास उत्तेजन देण्याबद्दल प्रयत्न केले आहेत; परंतु सरकारच्या इच्छेप्रमाणे मागासलेल्या लोकांच्या स्थितींत सदरहू प्रयत्नास जितके यावे तितके यश आले नाही, हे पाहून सरकारांस फार दिलगिरी वाटते.

ह्या विषयाबद्दल काळजीपूर्वक विचारांती सरकारांनी असे ठरविले आहे की, यशाच्या ह्या अभावाचे खरे कारण उंच प्रतिच्या शिक्षणास मोबदले पुरेसे विपूल दिले जात नाहींत, हे होय.

ह्या गोष्टीस काही अंशी तोड काढण्याकरिता व उंच प्रतीचे शिक्षणापर्यंत महाराज सरकारच्या प्रजाजनांपैकी मागासलेल्या वर्णांनी अभ्यास करावे, म्हणून उत्तेजन दाखल आपल्या संस्थानच्या नोकरीचा आजपर्यंत चालू असल्यापेक्षा बराच मोठा भाग त्यांच्याकरिता निराळा राखून ठेवणे हे इष्ट होईल, असे सरकारांनी ठरविले आहे.

ह्या रीतीस अनुलक्षून महाराज सरकार असा हुकूम करितात की, हा हुकूम पोहोचल्या तारखेपासून रिकामे झालेल्या जागांपैकी शेकडा पन्नास जागा मागासलेल्या लोकांस भराव्या. ज्या ऑफिसांमध्ये मागासलेल्या वर्गाच्या अमलदारांचे प्रमाण सध्यां शेकडा पन्नासपेक्षा कमी असेल तर पुढची नेमणूक ह्या वर्णांतील व्यक्तीची करावी.

ह्या हुकुमाच्या प्रसिद्धी नंतर केलेल्या सर्व नेमणुकांचे तिमाही पत्रक प्रत्येक खात्याच्या मुख्यांनी सरकारांकडे पाठवावे.

सूचना–मागासलेल्या वर्णांचा अर्थ ब्राम्हण, परभू, शेणवी, पारशी व दुसरे पुढे गेलेले वर्ण खेरीज करून सर्व वर्ण असा समजावा.

**हुजूर आज्ञेवरून,**
**नागेश पांडुरंग भिडे,**
**खाजगी कारभारी.**